आधुनिक विचारांचे
# वर्तमान



## सीडीएस पदासाठी मनोज नरवणे प्रबळ दावेदार

दिल्ली : तामिळनाडू येथे झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात देशाचे चीफ ऑफ डिफेंस स्टाफ जनरल बिपिन रावत त्यांच्या पत्नी मधुलिका रावत यांच्यासह एकूण १३ अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर देशाचे नवे सीडीएस नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यात महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचे भूमिपुत्र मनोज मुकुंद नरवणे हे मजबूत दावेदार असून त्यांची नियुक्ती पक्की मानली जात आहे. दरम्यान, सोशल मिडीयावर त्यांची नियुक्ती झाल्याच्या पोस्ट व्हायरल होत आहेत. मात्र त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केंद्र सरकारने अद्याप केलेली नाही.

बीड । रविवार, १२ डिसेंबर २०२१ । वर्ष : ४ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : ६ । पाने : ४ । मूल्य २ ₹

# गोपीनाथगड सर्वांचेच प्रेरणास्थान

## जयंतीदिनी पंकजा मुंडे यांचे प्रतिपादन; जयंतीनिमित्त अभिवादनासाठी गर्दी

प्रतिनिधी

परळी वैजनाथ : दिवंगत गोपीनाथराव मुंडे सर्व समाजाचे श्रध्दास्थान होते. त्यामुळे गोपीनाथगड सर्वांचेच प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन मुंडे यांच्या कन्या तथा भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी केले. त्या गोपीनाथगडावर बोलत होत्या.

लोकनेते दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांची आज जयंती आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त परळीजवळील गोपीनाथ गड येथे मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गोपीनाथ मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी उपस्थितांना संबोधित केले. गोपीनाथगड गावागावात पोहचला पाहिजे नेहमी गोपीनाथगडावर सगळे नेते, कार्यकर्ते, समर्थक येतात. गोपीनाथ मुंडे यांनी गरीबांच्या सेवा करण्याचा जो वारसा दिला आहे, तो आपण गावा–गावापर्यंत पोहोचवू.



गरीबातला गरीब, फाटक्यातल्या फाटक्या माणसापर्यंत सेवेचा हा वारसा पोहोचवू. वीटभट्टीवरील कामगार, ऊसतोड कामगार, खडी फोडणाऱ्या सगळ्यांपर्यंत गोपीनाथगड गेला पाहिजे, असा संकल्प आज करू, असे आवाहन पंकजा मुंडे यांनी यावेळी केले. गोपीनाथ मुंडेंचा सर्व जाती–धर्म, सर्व पक्षातील लोक, गोरगरीबांसोबत स्नेह होता. आज अनेक जणांनी गोपीनाथगडावर येऊन अभिवादन केले. अनेक राजकीय नेतेही गडावर आले पण ते पक्षभेद विसरून. आजचा दिवस माझ्यासाठी नाही. तसाच तो माझाही दिवस नाही. तर आजचा दिवस लोकांच्या सेवेसाठी समर्पित करणार असल्याचा संकल्प करत असल्याचे, मत पंकजा मुंडेंनी व्यक्त केले. त्या पुढे म्हणाल्या, देशातील सर्व नेते इथे आले की गोपीनाथगडावर नतमस्तक होऊनच जातात. कारण त्यांनी सगळ्या विचारांशी, जातींशी सलोखा निर्माण केला. त्यांचा हाच वसा पुढे चालवण्याचा दिवस आहे, असे मुंडे म्हणाल्या.

## दबंग खासदारांकडून कौतुक!



नवी दिल्ली : येथे बीडच्या दबंग खासदार डॉ.प्रितम गोपीनाथ मुंडे यांना 'दीपपर्व २०२१' अंक भेट देताना संपादक भगीरथ तोडकरी. यावेळी खासदार मुंडे यांनी 'दीपपर्व'च्या वाटचालीचे कौतुक केले.

# जय महेश बंद करू नका

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांची एकमुखी मागणी

प्रतिनिधी

माजलगाव : येथील जय महेश साखर कारखान्याच्या शेतकी अधिकाऱ्यांना मारहाण करून कारखाना टार्गेट करून तो बंद पाडण्याच्या काही लोकांच्या प्रयत्नांना खीळ बसत असून, कारखान्याने आपले गाळप बंद न करता सुरू ठेवावे, यासाठी तालुक्यातील विविध गावांतील शेतकरी, सामाजिक कार्यकर्त्यांनी शेतकरी हितासाठी हा कारखाना सुरू राहिलाच पाहिजे, यासाठी पाठिंबा दर्शविण्यासाठी दाखल होत कारखान्यावर रीघ लावली असल्याचे चित्र दिसून येत आहे. यावेळी विविध गावांतील शेतकरी, सरपंच, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते दररोज जय महेश कारखान्यावर गर्दी करत असून, कारखान्याचे उपाध्यक्ष गिरीश लोखंडे यांना भेटून 'तुम्ही कारखाना सुरू ठेवा आम्ही तुमच्या पाठीशी आहोत', असे सांगत लेखी पाठिंबा देत आहेत.

दरम्यान, जय महेश कारखान्यामुळे या परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे. याबरोबरच तालुक्यातील तरुणांना रोजगारही मिळालेला आहे.

## रांगोळीतून पवारांचे अभिष्टचिंतन!



परळी : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा अध्यक्ष शरद पवारांचा आज ८१वा वाढदिवस आहे. पवारांच्या वाढदिवसानिमित्त परळीत सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडेंच्या कार्यकर्त्यांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. मात्र सर्वांची नजर डोंगरातील एका कलाकृतीवर पडलीये. शरद पवार यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांनी दगड व रंगापासून पवार यांची प्रतिमा खास रांगोळीतुन साकारली आहे. ही कलाकृती मुंबई येथील क्रिएशन्सने तयार केलीय. ड्रोनच्या माध्यमातून ही दृश्ये खास दर्शकांसाठी आम्ही दाखवित आहोत.

## प्रा.मिलिंद आवाड यांना मिळणार महामंडळाचे अध्यक्षपद

प्रतिनिधी

मुंबई : स्वच्छ प्रतिमा आणि अभ्यासु नेतृत्व म्हणून सुपरिचित असलेले मानवी हक्क अभियान या संघटनेचे अध्यक्ष प्रा.मिलिंद आवाड यांची लवकरच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या अध्यक्ष पदी वर्णी लागणार असण्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली आहे. दरम्यान, साठे महामंडळाची सुत्रे क्लीन चेहरा असलेल्या यूवा नेतृत्वाकडे जात असल्याने आवाड समर्थकांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.



मानवी हक्क अभियान संघटनेच्या माध्यमातून व्यापक काम करणारे मिलिंद आवाड राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीशी जवळीक साधून आहेत. मागील विधानसभा निवडणुकीत आवाड समर्थकांनी प्रामाणिकपणे काम केले आहे. मिलिंद आवाड हे राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू मानले जातात. आवाड समर्थकांनी विधान परिषदेची मागणी केली होती मात्र प्राप्त परिस्थितीत त्यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे अध्यक्ष पद देण्यात येणार आहे, अशी माहिती पक्षाच्या वरिष्ठ नेत्याने दिली आहे. मानवी हक्क अभियान संघटने संस्थापक दिवंगत एकनाथराव आवाड यांना विधान परिषद देऊन असे आश्वासन शरद पवार यांनी दिले होते, त्या शब्दाला पक्ष जागेल असा अशावाद मिलिंद आवाड यांचे विश्वासू सहकारी राजेश घोडे यांनी व्यक्त केला.


